 Seat No. | | | | | |

**Time : 1½ Hours**

# SOCIAL SCIENCE-I (M)
## (History and Civics)

**Subject Code**

| S | 0 | 1 | 2 | A |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 4** **(Printed Pages : 6)** **Maximum Marks : 40**

**सूचना : —** (*i*) प्रत्येक प्रश्न नवीन पानावर लिहा.

(*ii*) प्रश्नांचा क्रमांक व उपक्रमांक स्पष्टपणे लिहा.

(*iii*) **सर्व** प्रश्न अनिवार्य आहेत.

(*iv*) उजवीकडील अंक प्रश्नाचे पूर्ण गुण दर्शवितात.

1\. (अ) खालील प्रत्येक विधानासमोर तीन पर्याय (अ, ब, क) दिले आहेत. त्यातील योग्य पर्याय निवडून त्याचे सूचकाक्षर विधानाच्या क्रमांकासमोर लिहा : 2

(*i*) 'संवाद कौमुदी' हे वृत्तपत्र ............................ यांनी सुरु केले.

(अ) रवींद्रनाथ टागोर

(ब) राजा राममोहन रॉय

(क) मुल्कराज आनंद

(*ii*) पंधराव्या शतकात जॉन गटेनबर्ग यांनी मुद्रण कलेचा शोध ............................ येथे लावला.

(अ) भारत

(ब) इंग्लंड

(क) जर्मनी

(*iii*) इ.स. 1765 मध्ये छापील साहित्यावर कर आकारणी ............................ द्वारे करण्यात आली.

(अ) शुगर एक्ट

(ब) स्टॅम्प एक्ट

(क) टाऊनशेन्ड एक्ट

(*iv*) फिलाडेल्फीया येथे वसाहतीची पहिली परिषद ............................ रोजी भरली.

(अ) 5 सप्टेंबर 1774

(ब) 10 मे 1775

(क) 19 ऑक्टोबर 1781

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 2

(1) भौगोलिक शोध उपक्रमात पोर्तुगालचे मुख्य उद्दिष्ट काय होते ?

(2) कोणत्या युद्धाचा खर्च वसाहतींकडून वसूल करण्यात यावा असे इंग्लंडच्या संसदेला वाटले ?

(क) खालील कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **दोन** वाक्यात लिहा : 2

(1) औद्योगिक क्रांतीनंतर भारतात राष्ट्रवादी विचारांचा प्रसार करण्याचे कार्य वृत्तपत्रांनी कसे केले ?

(2) कारखाना पद्धतीमुळे शहरांमध्ये कोणत्या समस्या निर्माण झाल्या ?

(ड) खालील कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **चार** वाक्यात लिहा : 4

(1) 18 व्या शतकात इंग्लंडच्या लोकसंख्येत उल्लेखनीय वाढ का झाली ?

(2) औद्योगिक क्रांतीमुळे पर्यावरणात्मक समस्या कशा निर्माण झाल्या ?

2. (अ) खालील 'अ' गटात काही व्यक्तींची नावे तर 'ब' गटात काही विधाने दिली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या जुळवून उत्तराचे सूचकाक्षर क्रमांकासमोर लिहा : 2

| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| (1) | मॉन्टेस्क्यू | (अ) | इस्टेटस् जनरलची सभा निमंत्रित केली |
| (2) | लुई सोळावा | (ब) | नौजवान भारतीय सेनेचा नेता |
| (3) | बाळ गंगाधर टिळक | (क) | सत्ता विभाजनाचा सिद्धांत मांडला |
| (4) | भगत सिंग | (ड) | फॉरवर्ड ब्लॉकची स्थापना |
| | | (इ) | शिवजंयती साजरी करणे सुरु केले |

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 2

(1) बुर्बोन घराणे कोणत्या धारणेनुसार राज्य करीत होते ?

(2) कोणत्या साली भारतात ईस्ट इंडिया कंपनीची राजवट संपुष्टात आली ?

(क) खालील विधानांची प्रत्येकी **दोन** कारणे लिहा : 6

(1) क्रिप्स प्रस्ताव फेटाळला.

(2) मॅझिनीने 'यंग इटली' ही नवीन संघटना स्थापना केली.

(3) जुलै 1848 मध्ये राष्ट्रीय लोकसभेचे अधिवेशन फ्रॅंकफर्ट येथे आयोजित करण्यात आले.

3. (अ) 'ब' रकान्यातील शब्दांचा संबंध 'अ' रकान्यातील शब्दांशी आहे. 'ड' रकान्यात 'क' रकान्यातील शब्दांशी तसाच संबंध दर्शविणारे शब्द क्रमांकासमोर लिहा : 2

| **क्र.** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| (1) | 18 जून 1946 | गोवा क्रांति दिन | 19 डिसेंबर 1961 | — |
| (2) | टी.बी. कुन्हा | पोर्तुगाल | दिवाकर काकोडकर | — |
| (3) | कनिष्ठ सभागृह | लोकसभा | वरिष्ठ सभागृह | — |
| (4) | केंद्र सूची | 97 विषय | समाईक सूची | — |

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 4

(1) भारतात सायमन आयोगाचे स्वागत 'सायमन परत जा' या घोषणेने का करण्यात आले ?

(2) गोवा विमोचन समितीचा मुख्य उद्देश्य काय होता ?

(3) विधेयकाचे कायद्यात रुपांतर केव्हा होते ?

(4) प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही **एका** साधनाचे नाव लिहा.

(क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** वाक्यात लिहा : 4

(1) डॉ. सालाझारने गोव्यात कोणते दमनकारी धोरण स्वीकारले ते लिहा.

(2) पंतप्रधानांना मंत्रीमंडळाचा प्रमुख या नात्याने कोणते अधिकार असतात ?

4. (अ) खालील प्रत्येक प्रश्नांसमोर तीन पर्याय (अ, ब, क ) दिले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून त्याचे सूचकाक्षर विधानाच्या क्रमांकासमोर लिहा : 2

(*i*) ग्रामसभेच्या बैठकीचे अध्यक्ष कोण असतात ?

(अ) अध्यक्ष

(ब) संचालक

(क) सरपंच

(*ii*) जिल्हा पातळीवरील लोकनियुक्त समितीला गोव्यात काय म्हणतात ?

(अ) ग्रामपंचायत

(ब) जिल्हा पंचायत

(क) विधान परिषद

(*iii*) गोवा विधानासभा संकुल कुठे आहे ?

(अ) पर्वरी

(ब) डिचोली

(क) म्हापसा

(*iv*) गोवा हे भारताचे पंचवीसावे राज्य केव्हा बनले ?

(अ) 8 जून 1962

(ब) 9 जानेवरी 1964

(क) 30 मे 1987

(ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा : 2

(1) विधान परिषदेला कायमस्वरुपी सभागृह असे का म्हणतात ?

(2) पंचायतीकडून कोणकोणते कर आकारले जातात ?

(क) खालील कोणत्याही **एका** विधानाची **दोन** कारणे लिहा : 2

(1) राज्यपालांना कार्यकारी अधिकार आहेत.

(2) राज्य प्रशासनामध्ये राज्य मंत्रीमंडळ सर्वांत शक्तिशाली अधिकारी असतात.

(ड) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** वाक्यात लिहा : 4

(1) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची पात्रता कोणती ?

(2) नगरपालिकांची स्वेच्छाधीन कर्तव्ये लिहा.